पुढारी | पुणे, शनिवार
१४ जुलै २०१८



# हुतात्मा राजगुरू विद्यालयात वृक्षारोपण

**पुणे :** जागतिक कृषी दिनानिमित्त शहरातील पांडवनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी आंबा, जांभूळ, चिंच, करंज व काही फूल झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लागवडीमधून मुलांमध्ये जबाबदारीची जाणीव होते व पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होत असल्याचे क्विक हील फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के यांनी या वेळी नमूद केले. पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत आयोजित कार्यक्रमावेळी, स्मिता आपटे, प्राचार्य चंद्रकांत जाधव, मुख्याध्यापिका जयश्री पाटील व विभागप्रमुख शारदा शेटे उपस्थित होते.